विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र
दैनिक
यशवंत
+लातूर/उस्मानाबाद/बीड/नांदेड +शनिवार दि.२७ फेब्रुवारी २०२१+वर्ष ४७ वे+ अंक-१४२ +पृष्ठ८+किंमत १ रुपया +RNI NO.39924/83 +



नवीन शैक्षणिक धोरणावर ऑनलाइन वेबिनार संपन्न

देगलूर (प्रतिनिधी): येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय देगलूर मधील आयक्यूएसी विभाग ,नीती आयोग व भारतीय शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन शैक्षणिक धोरणावर राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन वेबिनार चे यशस्वी आयोजन करण्यात आले होते .

केंद्र शासनाने नवीन शैक्षणिक धोरण जाहीर केले असून या शैक्षणिक धोरणाची सविस्तर माहिती ग्रामीण भागातील शिक्षक , प्राध्यापक व विद्यार्थी आदी वर्गांना व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी देगलूर महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार यांनी प्रास्ताविकपर विचाराच्या माध्यमातून वेबिनारच्या मागील आपली भूमिका जाहीर केली . या वेबिनारसाठी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री प्रकाश पाटील बेंबरेकर व सचिव श्री शशिकांत चिद्रावार उपस्थित होते. वेबिनारमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील वाणिज्य विषयाच्या प्राध्यापिका डॉ माधुरी देशपांडे , डॉ. शिवनिकर सर यांनीही मार्गदर्शन केले

साधन व्यक्ती म्हणुन पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालय औरंगाबाद येथील प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री सर यांनी नवीन शैक्षणिक धोरण व संशोधनाचे महत्व या विषयावर प्रकाश टाकला . प्रस्तुत वेबिनार चे सूत्रसंचालन डॉ. विनय भोगले यांनी केले तर आभार समन्वयक डॉ. लक्ष्मण सुदाम यांनी केले . वेबिनार यशस्वी करण्यासाठी मनोज साखरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

घरात बसा
कोरोना टाळा